
# इ-सनविवि

डिसेंबर २०२०



# संवाद

मंडळी , २०२० संपत आलं ....

संपूर्ण वर्षभर या २०२० ने खूप परीक्षा घेतली आपली . वेगवेगळ्या पातळ्यांवर इतकी वेगवेगळी आव्हानं समोर उभी ठाकली, की त्यांना तोंड देता देता माणसाची शक्ती पणाला लागायची वेळ आली .. वर्षाच्या

सुरवाती पासूनच Pandemic ने जगाला घाबरवून सोडलं , साधारण मध्यावर ऑस्ट्रेलियामधे मोठा वणवा पेटून नैसर्गिक साधनसंपत्तीची आणि वन्यजीवांची अपरिमित हानी सोसावी लागली , अनेक कलाकारांना आपण गमावलं .. इतक्या परीक्षा घेणारं हे वर्ष कधी संपेल याची आपण सगळेच अगदी वाट बघत होतो ... ते २०२०.. आता संपत आलंय ...

मनाची शक्ती खरोखर अगाध असते . आव्हानं जितकी मोठी , तितकीच त्यांचा सामना करण्याची ताकदही वाढते, मात्र कधी कधी मनाची सकारात्मकता सतत जागृत ठेऊन , ती  अतिशय प्रयत्नपूर्वक वाढवावी लागते, वाढवता येते , हेही या वर्षाने आपल्याला शिकवलं !

आपल्या महाराष्ट्र  मंडळाने अगदी हेच करून दाखवलंय ! हे संपूर्ण वर्ष, आव्हानांवर मात करत , नेहेमीपेक्षाही वेगवेगळे अभिनव उपक्रम , उत्तम पद्धतीने राबवत , हे कठीण २०२० , टीमने अगदी एकजूटी ने ट्वेंटी ट्वेंटी ची मॅच खेळावी तितक्या सकारात्मकतेने हाताळून , जिंकून घेतलंय ही फार आनंदाची गोष्ट आहे ! सुंदर सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यापासून , ते सामाजिक बांधिलकीचं भान सांभाळत  कोविडग्रस्तांसाठी जमवलेला निधी मुख्यमंत्र्यांना पोहोचवण्यापर्यन्त अनेक गोष्टी मंडळाने या काळात यशस्वीरित्या पार पाडल्या . या वर्षीचा दीपोत्सव , हा तर सगळ्यावर कळसच म्हणावा लागेल !

येणारं वर्ष वेगळं, सुंदर उजाडेल .. सर्व काही सुरळीत , पूर्वपदावर येईल ही आशा करूया .

चला तर मग ..

नव्या स्वप्नांची नवी किल्ले बांधणी करायला घेऊ ,

नव्या स्वागताच्या नव्या रांगोळ्या घालू , नव्या सुरवातीची नवी गाणी गाऊ ,आणि येणाऱ्या वर्षाचं, नव्या उमेदीने स्वागत करण्यासाठी सज्ज होऊ ...

---प्रवरा संदीप

# <u>आगामी</u>

# <u>ऑनलाईन नाट्योत्सव</u>

**<u>२३-२४-२५-२६ जानेवारी २०२१</u>**





**<u>(अधिक माहिती पुढच्या अंकात )</u>**

# अभिप्राय

## दीपोत्सव २०२० - - नाट्यरंग

मी मराठी नाट्यसंगीत व शास्त्रीय संगीत ह्यांचा विलक्षण वेडा चाहता आहे. महाराष्ट्र मंडळाने आयोजित केलेला सप्तसूर झंकारित बोले हा नाट्यसंगीताचा कार्यक्रम म्हणजे माझ्यासाठी पर्वणी होती. आणि रेखाचे विशेष आग्रहाचे आमंत्रण त्यामुळे पंचतुंड ही सुप्रसिध्द नांदी ऐकल्यावर मन नाट्यसंगीताच्या सुवर्ण युगात गेले व मी तदाकार झालो. निवेदन अप्रतिम होते. उत्तम संगीताला अप्रतिम निवेदनाची साथ म्हणजे महाकवि कालिदासाच्या भाषेत "रत्नं समागच्छतु कांचनेन" असा रत्नकांचन योग होता. "कशी या त्यजू पदाला" माझे फार आवडते गाणे नंतर "नाचत ना गगनात नाथा" हे पद मला देवाघरची दौलत दाखवून गेले. एका नंतर एक अशा विलक्षण श्रवणीय पदांची बरसात झाली. पुरणाची पोळी चांगली की खव्याची पोळी चांगली असा संभ्रम निर्माण झाला. "मुरलीधर शाम हे नंदलाल" हे गाणे मला माझ्या अतिशय आवडत्या दैवताशी एकरूप करून गेले. ज्ञानदेवांच्या भाषेत पंचम सुराला परिमळु आणि सुस्वादु प्राप्त झाला.

**-- डॉ. सुरेश देशपांडे**

## ई – बझार : (Feedback)

•I thank Swakruta and Maharashtra Mandal for organizing E-Bazaar. It was a Great Opportunity for me to advertise my products on a new platform and reach many more people. Happy to share that I've got an overwhelming response for diwali faral. **..... Vaishali Gaonkar**

•Hello friends, So happy to inform you that we delivered 2 shipments to Bengaluru. Thanks for the opportunity to Pooja and all team members of MMB and Swakruta. - **Uttara Deshmukh**

•Thank u everyone who worked hard for d success of e-bazar !

•I got many orders. my stock of Diwali items is almost over. So happy that I decided to take part in this event. I think people r just prioritising things and shopping only for festivals. I also expected that will order d stock twice at least but m happy that at least whatever stock I bought is sold out .. thank u again for this opportunity **- Pallavi Pramod**

# किल्ले स्पर्धा- निकाल

दीपोत्सव २०२० मध्ये प्रथमच ऐतिहासिक किल्ले स्पर्धा घेण्यात आली. यात १२ संघांनी भाग घेतला . महाराष्ट्र मंडळातर्फे समीर प्रधान, आदित्य जोग, मधुरा परुळेकर व रेवती मोडक यांनी समन्वयकाचे काम केले.

श्री. महेश तेंडुलकर आणि श्री. अनुराग वैद्य यांनी सुयोग्य परीक्षण केले. मंडळाचे ज्येष्ठ सभासद श्री. शरदकाका ब्रह्मे यांनी या किल्ला स्पर्धेच्या विजेत्या संघासाठी **"हर हर महादेव"** हा करंडक प्रायोजित केला आहे.

रॉयल राजपूत हा संघ ह्या वर्षी हर हर महादेव करंडकाचा मानकरी ठरला आहे.

ऐतिहासिक किल्ला स्पर्धेचे विजेते खालील प्रमाणे आहेत.

| क्रमांक | संघाचे नाव | किल्ल्याचे नाव | सभासद |
|---|---|---|---|
| प्रथम | रॉयल राजपूत | चितोडगड | शिल्पा वाळिंबे, अभिजीत वाळिंबे , अर्णव वाळिंबे, अथर्व वाळिंबे |
| द्वितीय | मोरोपंत | प्रतापगड | ध्रुव देशपांडे , विक्रांत देशपांडे, विदुला देशपांडे, |
| तृतीय | तानाजी | सिंधुदुर्ग | अमेय रानडे , अनुजा रानडे, अन्वी रानडे, इशान कुलकर्णी |
| उत्तेजनार्थ | हिरोजी | रामशेज | दत्तात्र्येय बेलमकर ,मालती बेलमकर ,निखिल बेलमकर, अनुराधा बेलमकर, निरंजन बेलमकर, आरोही बेलमकर |
| उत्तेजनार्थ | छोटे किल्लेदार | सुवर्णदुर्ग | आहान देशमुख ,अवनी चौगुले, व्योम चौगुले, अद्विक घोरपडकर , सनिध घोरपडकर, इंद्रनील जोशी, सचेतस गांधी, दिविजा पळसोदकर |











सर्व स्पर्धकांचे हार्दिक अभिनंदन आणि विजेत्यांचे विशेष कौतुक. !!

# <u>ई – बझार – निकाल</u>

इ  बाजार मध्ये प्रदर्शित केलेल्या स्टॉल्स चे  श्रीमती मोहाडीकर आणि श्री.श्रीवास्तव यांनी परीक्षण केले. वैविध्य, नावीन्य, सृजनशीलता इत्यादी निकषांवर  ५ स्टॉल ना  विजेते घोषित केले आहे.

त्यांची नावे  खालीलप्रमाणे :

| **स्टॉल चे नाव** | **स्टॉल धारकाचे नाव** |
|---|---|
| फ्लेम्स अँड फ्लेवर्स | नीता  बजाज |
| ब्लूम्स जॉय फ्लोरल ज्वेलरी | पल्लवी प्रमोद |
| रितूज क्रिएशन | ऋता सेनशर्मा |
| उत्कला क्रिएशन्स  - | संगीता खरे, श्वेता वैद्य |
| एस. के. चॉकलेट्स | -  कल्पना चाफेकर |

ह्या उपक्रमात सहभागी झालेल्यांचे विशेष आभार !!

# किल्ले....

आठवणीतले प्रत्यक्षात !!!

जेव्हा महाराष्ट्र मंडळाने किल्ला स्पर्धा घोषित केली, तेव्हा माझं मन ४४-४५ वर्षां पूर्वी मला घेऊन गेले १९७४-७५ साल असावे आणि माझे वय ११ वर्षांचे असावे. एकदा गप्पांदरम्यान माझ्या वडिलांनी मला सांगितले की ते लहान असताना किल्ला कसे बनवायचे आणि यामुळे मला किल्ल्यांबद्दल उत्सुकता निर्माण झाली आणि मग त्यांनी मला एक प्रश्न विचारला की तुला किल्ला करायला आवडेल का? मला आनंद झाला आणि मी हो म्हणालो. आम्ही नुकतेच कलकत्त्याहून पुण्याला आलो होतो त्यामुळे अजून किल्ला कसा बनवतात हे बघितलेले नव्हते त्यामुळे खूप उत्साहाने पुढे सरसावलो पण एक आव्हान होतं की आम्ही एका फ्लॅटमध्ये राहात होतो आणि तिथे किल्ला करायला माती कुठुन आणायची ? माझे वडील म्हणाले ती काळजी माझ्यावर सोड. त्यानंतर काही दिवसांनी मला माती भरलेलं एक मोठं पोतं आणून दिलं व थोडी बारीक वाळू आणि थोड्या प्रमाणात खडी आणून दिली. मग माझ्या मित्रांच्या सोबत मी आजूबाजूला काही दगड शोधले आणि बोअरवेलचे काही गोल खडक देखील सापडले. एकदा हे काम झाल्यावर माझ्या मित्रांसह मी कामाला लागलो आणि एक सुंदर किल्ला बांधला,माझ्या वडिलांच्या मार्गदर्शनाने. माझ्या आईने मला थोडेसे अळीव आणि गहू दिले आणि आम्ही ते पेरले व रोज त्याला पाणी घातले. त्याला थोड्या दिवसांत छान हिरवीगार पालवी फुटली.आणि ते किल्ल्यावरचे जंगल झाले मग आम्ही किल्ल्यासाठी मातीचे मावळे , शिवाजी महाराज आणि तोफा आणल्या व आमचा किल्ला सजवला . त्या दिवाळीला घरी आलेल्या सर्व लोकांना मी माझा किल्ला मोठ्या अभिमानाने दाखविला. माझ्यासारखा या वर्षी ज्या बालगोपालांनी / स्पर्धकांनी ह्या किल्ला स्पर्धेत भाग घेतला त्यांच्यासाठी हा अनुभव अविस्मरणीय राहील.

महाराष्ट्र मंडळ बंगलोर आणि सर्व पालकांचे आभार ,ज्यांनी त्यांचा हा अनोखा सर्जनशील अनुभव महाराष्ट्रातून शेकडो कि.मी. दूर बंगलोर शहरातील सर्व सभासदांना दिला.

वर नमूद केलेल्या किल्ला स्पर्धेबद्दल मी थोडेसे सांगतो. या स्पर्धेसाठी जवळपास 12 प्रवेशिका आल्या होत्या तो एक चांगला पायंडा आहे.चांगली सुरुवात आहे. नोंदणी झाल्यानंतर महाराष्ट्र मंडळाने पुणे येथील तज्ज्ञ महेश तेंडुलकर आणि अनुराग वैद्य यांच्यासमवेत सर्व टीम लीडरसमवेत झूम कॉल आयोजित केला होता. महेश तेंडुलकर आणि अनुराग वैद्य "किल्ला" या विषयावरील तज्ज्ञ आहेत. त्यांनी ब्याच किल्ल्यांना भेट दिली आहे व किल्ला या विषयावर काही पुस्तकेही लिहिली आहेत. या तज्ज्ञांनी वैज्ञानिक पद्धतीने किल्ला कसा बनवायचा याबद्दल काही टिप्स स्पर्धकांना दिल्या. मग खरी गंमत सुरू झाली, जेव्हा सुमारे ५ वर्षापासून ते ५५-६०वर्षे वयोगटातील सर्व ५७ वडीलधारी आणि बच्चा कंपनी किल्ला बनवण्यात गुंतली. या प्रक्रियेत सर्वांना ते बनवत असलेल्या किल्ल्याच्या भव्य भूतकाळाविषयी आणि त्याच्या इतिहासाबद्दल सर्व माहिती शोधावी लागली. त्यांनी किल्ल्यांचा सविस्तरपणे अभ्यास केला व त्या किल्ल्यांच्या, त्यांच्या बारकाव्यांसकट प्रतिकृती उभ्या केल्या. यावर्षी स्पर्धेत समुद्री किल्लेही बरेच होते जे अद्वितीय होते आणि एक किल्ला राजस्थान मधलाही होता.

स्पर्धेत खालील किल्ल्यांचा सहभाग होता ...

सिंधुदुर्ग, रोहिडेश्वर, विजयदुर्ग, रायगड, जंजिरा, राजगड, पन्हाळा, सुवर्णदुर्ग, रामशेज, चित्तौडगड, प्रतापगड.

किल्लांचे परीक्षण अतीशय खोलात जाऊन व बारकाईने केले गेले .

विजेते किल्ले होते....

1. प्रथम पुरस्कार- **चित्तौडगड**;
2. द्वितीय पुरस्कार- **प्रतापगड**,
3. तृतीय पुरस्कार -**सिंधुदुर्ग** .
4. उत्तेजनार्थ बक्षिसे : **रामशेज** व **सुवर्णदुर्ग** यांना मिळाली.

ज्या लोकांची ही किल्ले स्पर्धा पाहण्याची ती वेळ हुकली त्यांना ह्या स्पर्धेचे व्हीडीओ महाराष्ट्राच्या मंडळाच्या यूट्यूबवर पहायला मिळतील आणि त्यांना ते नक्की आवडतील याची मला खात्री आहे.

ज्याची लिंक खाली दिली आहे
https://www.youtube.com/channel/UC9zazbhMNkUO0mZglJ4icDQ

विवेक पळसुले

बंगलोर

# <u>रांगोळी स्पर्धा</u>

महाराष्ट्र मंडळाच्या शताब्दी वर्षातील दीपोत्सव २०२० मधे आपण घराघरातील रांगोळ्या दाखवल्या.

सण किंवा शुभ कार्याला प्रारंभ करताना लक्ष वेधणारा पहिला घटक म्हणजे रांगोळी!!भारतीय संस्कृतीचे आणि परंपरेचे रांगोळी हे प्रतिक मानले जाते.६४ कलांपैकी एक कला मानल्या जाणाऱ्या ह्या रांगोळीचे स्थान प्राचीन काळापासून देवासमोर, तुळशी समोर आणि स्वच्छ अंगणाची शोभा वाढविण्यासाठी दिले गेले आहे.

आजकाल पारंपरिक रांगोळ्यांबरोबर विविध प्रकारचे साहित्य वापरुन रांगोळ्यां काढलेल्या दिसतात.यानुसारच आपण गणपती, ओटीचे सामान वापरलेली, धान्याची, पुकोलम , ३डी, विष्णुचे अवतार, मसाल्याचे पदार्थ वापरलेली व सुरेख रंगसंगीतीने रेखलेली,खास दिवाळीची शोभा वाढवणा-या ८ रांगोळ्या दाखवल्या.

या सर्व रांगोळ्यांनी आपल्या विविध रंगात नटलेल्या दीपोत्सवाला पूर्णत्वाचे स्वरुप दिले व आपण साधला पारंपारिकता, संस्कृती व नाविन्य यांचा सुरेख आणि अनोखा असा संगम !!

समन्वयक

वीणा कवठेकर

वैशाली तोरवी.



१. शुभांगी दशपुत्रे - गणपती



२. श्री मुळगुंद - विष्णूचे अवतार



३. देवश्री धरणगावकर - धान्य रांगोळी



४. अश्विनी डोंगरे - ३ डी रांगोळी




५. सुमा करमरकर - दिवाळी रांगोळी



६. अलका कुंटे - पुकोलम



७. अंजना घैसास - मसाल्याचे पदार्थ वापरुन



८. विदुला देशपांडे - ओटीचे सामान वापरुन

# <u>रेशीमगाठी</u>

**विवाहेच्छू तरुणी:**

१. वय - २९, ५ ' ४"
शिक्षण - पोस्ट ग्रॅज्युएट in Fashion Designing
नोकरी - fashion Designer , मुंबई येथे
अपेक्षा - उच्चशिक्षित , मनमिळावू
संपर्क - ९८१९२ १८७६१ ,
savanurbp @yahoo.co.in

२. वय - ३०, ५ ' ४"
शिक्षण - B A
नोकरी - सरकारी नोकरी
अपेक्षा - अनुरूप
संपर्क - ९८४५०५६४६१ ,
rashu123@gmail.com

**विवाहेच्छू तरुण:**

१. वय - २६, उंची ६ फूट,
शिक्षण B. E. , ( computer Science),
नोकरी / व्यवसाय - Zeta India , बंगलोर येथे नोकरी,
अपेक्षा - इंजिनिअर , नोकरी करणारी,
संपर्क - ९८४४४२६३२३,
riteshsanjaymahajan@gmail.com

२. वय - ३८ ,उंची ५ फूट ९ इंच
शिक्षण Msc ( submitted थिसिस फॉर PhD ),
नोकरी - Reseach associate @ ATree , बंगलोर
अपेक्षा - पोस्ट ग्रॅज्युएट , शक्यतो ब्राह्मण ,निसर्गाची आवड असणारी
संपर्क -९७५७१२५२५२
ई-मेल dilipdvelankar@gmail.com